एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत हातमाग विणकरांना केंद्र पुरस्कृत कच्चा माल पुरवठा योजनेतील (आरएमएसएस) धाग्यावर हातमाग विणकरांना अतिरीक्त अनुदान देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्र. हातमाग-२०२३/प्र.क्र.९४/टेक्स-३**

नविन प्रशासकीय भवन,१४ वा मजला

मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : १० नोव्हेंबर,२०२३

**वाचा :-** शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण -२०२३/ प्र.क्र.८१/टेक्स-५ , दिनांक २/०६/२०२३.

**प्रस्तावना-**

राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी व वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांना हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२३ मध्ये पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहिर केले असून राज्यातील हातमाग क्षेत्राचे बळकटीकरण करणे, हातमागावर उत्पादीत होणा-या कापडाची किंमत जास्त होत असल्याने ती नियंत्रीत करणे, हातमागावर उत्पादीत वाणाला बाजारपेठेत चांगली मागणी प्राप्त होवून हातमाग व्यवसाय वाढावा यासाठी केंद्रशासनाच्या योजनेत राज्याचा हिस्सा देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

केंद्र शासन संख्यात्मिक निर्बंधासह धाग्यावर (डीबीटी लींक बँक खात्यावर) १५% अनुदान देते. सदर धाग्यावर राज्यशासन अतिरिक्त १५% अनुदान देईल. एकूण ३०% (१५ % केंद्रशासनाचा हिस्सा आणि १५ % राज्याचा हिस्सा ) अनुदान हे कॉटन हँक धागा, घरगुती रेशीम, लोकरी आणि लीनन धागा आणि नैसर्गिक तंतुच्या मिश्रीत धाग्यावर अनुज्ञेय राहिल.

**१.योजनेची पात्रता:-**

१) केंद्रशासनाच्या कच्चा माल पुरवठा योजनेंतर्गत १५ टक्के अनुदान मिळणारा विणकर राज्य योजनेंतर्गत १५ टक्के अनुदान मिळण्यास पात्र असेल.

२) संबंधित विणकर महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा.

३) संबंधित विणकर हा विणकर व्यवसायात कार्यरत असे पर्यंत सदर योजनेंतर्गत मिळणा-या लाभास पात्र असेल.

Scanned with OKEN Scanner

४) लाभार्थी विणकरास स्वत: विणकाम करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थतीत सुत घेवून दूस-यास विक्री / हस्तांतरण करता येणार नाही, असे आढळून आल्यास सदर योजनेसाठी अपात्र ठरविण्यांत येईल

**२.योजनेचे निकष:-**

१) केंद्र शासनाच्या हिस्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा अदा करण्यांत येईल.

२) सदर योजनेंतर्गत लाभार्थींना अदा करण्यांत येणारा निधी थेट लाभार्थीच्या बँक खात्यात जमा करण्यांत येईल.

३) सदर योजनेंतर्गत लाभ घेणा-या विणकराची वस्त्रोद्योग विभागामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यांत येईल व योजनेंतर्गत गैरकायदेशीरपणे फायदा घेत असल्याचे आढळून आल्यास देण्यात आलेले अनुदान वसूल करण्यांत येईल व कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

**३.पात्र लाभार्थी निवडण्याची कार्यपध्दती:-**

१) केंद्र शासन अथवा केंद्र शासनाची यंत्रणा राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळ (एनएचडीसी) यांचे कडून प्राप्त झालेली यादी (सविस्तर माहितीसह) खालील समिती समोर मंजूरी साठी ठेवण्यांत येईल.

| | |
|---|---|
| अ) आयुक्त वस्त्रोद्योग म.रा. नागपूर --- | अध्यक्ष |
| ब) सहआयुक्त (तांत्रिक) वस्त्रोद्योग म.रा. नागपूर --- | सदस्य सचिव |
| क) सहायक संचालक लेखा, वस्त्रोद्योग म.रा. नागपूर --- | सदस्य |
| ड) उपसंचालक, विणकर सेवा केंद्र (सबंधीत) ----- | सदस्य |
| इ) राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळ (एनएचडीसी) यांचा प्रतिनिधी - | सदस्य |
| ई) प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग नागपूर - | सदस्य |

सदर समितीने मंजूर दिल्यानंतर राज्य शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार सबंधीत लाभार्थीच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याची कार्यवाही आयुक्तालयाकडून करण्यांत येईल.

सदर समितीची बैठक दरमहा आयोजित केली जाईल.

४) सदर योजनेकरीता " **मागणी क्रमांक व्ही-२ , लेखाशिर्ष- २८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०३) (०२) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत कच्चा माल पुरवठा योजनेतील (आरएमएसएस) राज्य घटक (कार्यक्रम) (२८५१ ७४७२), ३३ अर्थसहाय्य.** " या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.



Scanned with OKEN Scanner

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३१११०१८२३४९४००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

(श्रद्धा कोचरेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे अप्पर मुख्य सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह,विधी व न्याय) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
४. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
५. मा.मंत्री(सर्व) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
८. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.
९. महालेखापाल ( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११.आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२.संचालक(रेशीम),रेशीम संचालनालय,नागपूर.
१३.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१४.अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१६.वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
१६.प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), मुंबई/नागपूर/औरंगाबाद/सोलापूर.
१७. निवड नस्ती ( टेक्स-३)



Scanned with OKEN Scanner

१६.अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.

१८. सर्व प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग),

१९. निवड नस्ती ( टेक्स-३).



Scanned with OKEN Scanner

## "परिशिष्ट-अ"

### हातमाग विणकरांना २०० युनिट पर्यंत मोफत विज अनुदान मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

१.विणकराचे नांव -

२.पूर्ण पत्ता (आधार कार्डनुसार) -

३.विणकर ओळखपत्र क्रमांक -

४.वीज मीटर क्रमांक -

५.वीज मीटर अर्जदाराच्या नावे आहे काय? - होय/नाही.

६.नसल्यास वीज मीटर धारकाचे नाव -

७.अर्जदाराचे वीज मीटरधारकाशी असलेले नाते-

८.मागील ३ महीन्याचे वीज बीलाची माहीती.

a) माहे-----------, युनिट वापर संख्या-------------, वीज बीलाची रक्कम रूपये----------

b) माहे-----------, युनिट वापर संख्या-------------, वीज बीलाची रक्कम रूपये----------

c) माहे-----------, युनिट वापर संख्या-------------, वीज बीलाची रक्कम रूपये----------

---

वरील ३ महीन्याची सरासरी -------------- --------------

९) सद्या हातमाग व्यवसाय करीत असल्यास तपशिल

a) उत्पादीत कापडाचा प्रकार------------------

b) उत्पादन स्वत:चे किंवा महामंडळ/संस्था/इतर

c) घरी हातमाग आहे काय-----

d) नसल्यास विणकाम करीत असलेल्या ठिकाणाचे नांव -

१०) विणकर खालीलपैकी कोणत्या यंत्रणेशी जोडलेला आहे.

a) म.रा. हातमाग महामंडळ म. नागपूर यांचेशी जोडला असल्यास नोंदणी क्र. -------

b) विणकर संस्थेशी जोडला असल्यास (संस्थेचे नांव नमुद करावे) -------------------



Scanned with OKEN Scanner

c) खाजगी असल्यास कधी पासून विणकाम करतो व उत्पादीत वाणाचा प्रकार ----------------

११) आधार कार्ड क्र.

## अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रे

१) विणकर ओळखपत्राची स्व प्रमाणित प्रत

२) आधार कार्डची स्व प्रमाणित प्रत

३) रहिवासी दाखला

४) हातमाग महामंडळ / विणकर हातमाग सहकारी संस्थेचा सभासद असल्यास-

(a) मागील ६ महिन्याची विणकाम मजूरी दिल्याबाबतचे प्रमाणपत्र.

(b) खाजगी विणकर असल्यास तो उत्पादीत करीत असलेल्या वाणाचा प्रकाराबाबत स्वघोषणा पत्र.

(c) विणकाम करत असल्याचा पुरावा म्हणून कच्चा माल खरेदी बील/पक्का माल विक्रीचे बील.

५) विजेचा वापर केवळ त्यांचे कुटूंबासाठीच करण्यांत येईल. वीजेचा गैरवापर ( इतरांना वीज पूरवठा करणे/ हातमाग व घरगूती वापराशिवाय इतर व्यवसायासाठी विजेचा वापर करणे) केल्याचे आढळल्यास विज अनूदान बंद करणे किंवा पुढील कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील असे स्वघोषणा पत्र. .

५) विणकराचा अलीकडचा फोटो.

६) मागील ३ महीन्याचे वीज बील.

***



Scanned with OKEN Scanner